# वजाबाकी : हातच्याची

## वजाबाकी हातच्याची (पूर्वतयारी)

✦ 




१० रुपये म्हणजे १ रुपयाची १० नाणी.






१०० रुपये म्हणजे १० रुपयांच्या १० नोटा म्हणजेच १ रुपयाची १०० नाणी.



१० उसांची एक मोळी याप्रमाणे १० मोळ्या म्हणजे एकूण १०० ऊस.

सोनू : माझ्याकडे १०० रुपयांच्या दोन नोटा आहेत. मला नंदूला ७० रुपये द्यायचे आहेत.

सलमा : तू कसे देशील ?

सोनू : मी १०० रुपयांची एक नोट सुटी करून १० रुपयांच्या १० नोटा आणते.

नंदू : त्यांतून तू मला १० रुपयांच्या ७ नोटा दे.

सलमा : म्हणजे सोनूकडे १०० रुपयांची १ नोट व १० रुपयांच्या ३ नोटा उरतील.

सोनू : हो ! म्हणजे माझ्याकडे १३० रुपये उरतील.

१ शतक = १० दशक

२ शतक = १ शतक १० दशक

३ शतक = २ शतक १० दशक

५ शतक = ४ शतक + ☐ दशक


४ शतक = ३ शतक १० दशक

७ शतक = ६ शतक १० दशक

६ शतक = ☐ शतक + १० दशक


✦ वजाबाकी करताना कधीकधी १ शतक किंवा १ दशक मोकळा करावा लागतो. जास्त शतक किंवा जास्त दशक असतील तरी एकच शतक किंवा एकच दशक मोकळा करावा लागतो.

३ शतक
यांतील १ शतकाचे दशक करू.




३ शतक म्हणजे २ शतक १० दशक.

२ शतक
यांतील १ शतकाचे दशक करू
आणि त्यांतील १ दशकाचे एकक करू.




२ शतक म्हणजे १ शतक १० दशक,
म्हणजेच १ शतक ९ दशक १० एकक.

## वजाबाकी : दशक मोकळा करून

✦ खालील उदाहरण अभ्यासा.

| | द | ए |
|---|---|---|
| | ५ | १ |
| − | २ | ४ |
| | | |

माझ्याजवळ ५१ रुपये आहेत. दहाच्या ५ नोटा व १ सुटा रुपया आहे. त्यांतून मला २४ रुपये दुकानदाराला द्यायचे आहेत.
एककातील १ मधून ४ देता येत नाहीत, म्हणून दहाची एक नोट सुटी करून तिचे १० सुटे रुपये करू.

| | द | ए |
|---|---|---|
| | ४ | ११ |
| | ~~५~~ | ~~१~~ |
| − | २ | ४ |
| | २ | ७ |

आता माझ्याजवळ दहाच्या ४ नोटा व सुटे झालेले १० रुपये आणि आधीचा १ रुपया मिळून ११ सुटे रुपये होतील.
११ सुट्या रुपयांमधून ४ सुटे रुपये देऊ, म्हणून ११ मधून ४ वजा करू. ७ सुटे रुपये उरतात. हे ७ एककाखाली लिहू.
आता दशकांची वजाबाकी करू. ४ मधून २ वजा करू. उरले २.
वजाबाकी आली २७, म्हणून माझ्याकडे २७ रुपये उरले.

✦ वजाबाकी करा.

| | द | ए |
|---|---|---|
| | ५ | १२ |
| | ~~६~~ | ~~२~~ |
| − | २ | ७ |
| | ३ | ५ |

| | द | ए |
|---|---|---|
| | | |
| | ७ | ३ |
| − | ४ | ५ |
| | | |

| | द | ए |
|---|---|---|
| | | |
| | ८ | १ |
| − | ५ | ८ |
| | | |

| | द | ए |
|---|---|---|
| | | |
| | ९ | ० |
| − | ६ | ९ |
| | | |

## वजाबाकी : शतक मोकळा करून

✦ नंदूजवळ १०० रुपयांच्या ५ नोटा, १० रुपयांच्या दोन नोटा व १ रुपयाची ७ नाणी आहेत. त्याने सोनूला त्यांपैकी ३१८ रुपये दिले, तर त्याच्याजवळ किती रुपये उरले ?

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | १ | १७ |
| | ५ | ~~२~~ | ~~७~~ |
| – | ३ | १ | ८ |
| | २ | ० | ९ |

७ नाण्यांतून ८ नाणी देता येत नाहीत, म्हणून १० च्या दोन नोटांपैकी १ नोट सुटी करावी लागणार.
त्यामुळे येथे १० च्या एका नोटेचे १० व पहिले ७ म्हणजे १७ सुटे रुपये होतील. १७ मधून ८ रुपये देऊ. १० ची १ नोट आहे, ती देऊ, म्हणजे १० ची नोट उरणार नाही. शंभराच्या ५ नोटांमधून ३ नोटा देता येतील, म्हणून नंदूजवळ २०९ रुपये उरतील.

✦ वजाबाकी करा : ५४५ – २६५

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | ४ | १४ | |
| | ~~५~~ | ~~४~~ | ५ |
| – | २ | ६ | ५ |
| | २ | ८ | ० |

५४५ म्हणजे ५ शतक ४ दशक व ५ एकक. त्यांतून २६५ वजा करायचे आहेत. ५ एककांमधून ५ एकक वजा करू. उरले शून्य एकक. आता ४ दशकांतून ६ दशक वजा करता येणार नाहीत, पण ५ शतक आहेत, त्यांतील १ शतक मोकळा करू. शतकाच्या घरात ४ राहिले. एका शतकाचे १० दशक होतात. ते १० व आधीचे ४ असे १४ दशक आहेत. त्यांतून ६ दशक वजा करू, म्हणजे ८ उरले. आता ४ शतकांतून २ शतक वजा करू. उत्तर आले २८०.

✦ वजाबाकी करा.

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | २ | ७ | १ |
| – | १ | ३ | ८ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ६ | ५ | ४ |
| – | | ५ | ६ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ७ | ३ | १ |
| – | २ | ४ | ८ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ८ | ३ | ५ |
| – | २ | ५ | ८ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ५ | ६ | ७ |
| – | २ | ४ | ९ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ६ | ५ | ० |
| – | ६ | ४ | ५ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ७ | ७ | ५ |
| – | ३ | ९ | ७ |
| | | | |

| | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| | ६ | ८ | ० |
| – | १ | ५ | ४ |
| | | | |

✦ वजाबाकी करा : ५०७ − २८८

| श | द | ए |
|---|---|---|
| ४ | ९ ~~१०~~ | १७ |
| − ~~५~~ | ~~०~~ | ~~७~~ |
| २ | ८ | ८ |
| २ | १ | ९ |

७ एककातून ८ एकक वजा होत नाहीत, म्हणून एक दशक मोकळा करायला हवा; पण दशकस्थानीही काही नाही, म्हणून १ शतक मोकळा करून १० दशक मिळवू. मग त्यांतील एक दशक मोकळा करून १० एकक मिळतात. ते व पहिले ७ असे १७ एकक झाले. त्यांतून ८ एकक वजा करून ९ एकक उरले, ते वजाबाकीत लिहू. आता दशकाच्या घरात ९ आहेत, त्यातून ८ वजा केले. १ दशक उरला तो वजाबाकीत लिहू. शेवटी ४ शतक शिल्लक आहेत. त्यातून २ वजा करून उरलेले २ शतक वजाबाकीत लिहू. वजाबाकी २१९ आली.

✦ वजाबाकी करा : ९०० − ३६५

| श | द | ए |
|---|---|---|
| ८ | ९ ~~१०~~ | १० |
| − ~~९~~ | ~~०~~ | ~~०~~ |
| ३ | ६ | ५ |
| ५ | ३ | ५ |

येथे ० एककातून ५ एकक वजा होत नाहीत, म्हणून दशक मोकळा करायला हवा; पण दशकस्थानीही काही नाही, म्हणून १ शतक मोकळा करून १० दशक मिळवू. मग त्यातील एक दशक मोकळा करून १० एकक मिळतात. त्यांतून ५ एकक वजा करू. उरलेले ५ एकक वजाबाकीत लिहू.
आता दशकाच्या घरात ९ आहेत, त्यांतून ६ वजा केले. ३ दशक उरले ते वजाबाकीत लिहू. शेवटी ८ शतक शिल्लक आहेत. त्यांतून ३ वजा करून उरलेले ५ शतक वजाबाकीत लिहू. वजाबाकी ५३५ आली.

✦ वजाबाकी करा.

| श | द | ए |
|---|---|---|
| | | |
| − २ | ० | ५ |
| | | ६ |
| | | |

| श | द | ए |
|---|---|---|
| | | |
| − ३ | ० | ० |
| | ९ | ५ |
| | | |

| श | द | ए |
|---|---|---|
| | | |
| − ८ | ० | ० |
| २ | ० | ७ |
| | | |

| श | द | ए |
|---|---|---|
| | | |
| − ७ | ० | ० |
| ३ | ४ | ८ |
| | | |

✦ उभी मांडणी करून वजाबाकी करा.

✤ २४५ − ६ ✤ ३४८ − ५९ ✤ ५५६ − ३६८

✤ ४०७ − २४० ✤ ८४५ − ६५७ ✤ ९३२ − ७५४

✦ दिलेले अंक वापरून सर्वांत मोठी तीन अंकी संख्या व सर्वांत लहान तीन अंकी संख्या तयार करा व त्यांची वजाबाकी करा.

✤ ३, ५, ४ ✤ ६, ५, १ ✤ ७, २, ५ ✤ ३, ४, ८

## शाब्दिक उदाहरणे

- महाराज बागेत १७५ आणि सयाजी बागेत २६८ झाडे आहेत. तर सयाजी बागेत, महाराज बागेपेक्षा किती झाडे जास्त आहेत ?
  सयाजी बागेत झाडे जास्त आहेत.
  त्यांतून महाराज बागेतील झाडांची संख्या वजा करू.
  सयाजी बागेत ☐ झाडे जास्त आहेत.

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | २ | ६ | ८ | सयाजी बागेतील झाडे |
| – | १ | ७ | ५ | महाराज बागेतील झाडे |
| | | | | जास्त झाडे |

- दुकानात काही पुस्तके आहेत. दुकानदाराने आणखी १२५ पुस्तके आणली. दुकानात एकूण २३४ पुस्तके झाली, तर सुरुवातीला दुकानदाराकडे किती पुस्तके होती ?

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

- शाळेत ३५० मुली व २१५ मुलगे आहेत, तर मुलग्यांपेक्षा मुली किती जास्त आहेत ?

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

- मेरीकडे ५०० रुपये होते. तिने त्यांपैकी २७५ रुपयांची पुस्तके घेतली, तर तिच्याकडे किती रुपये शिल्लक राहिले ?

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

- दिलेल्या माहितीच्या आधारे वजाबाकीची शाब्दिक उदाहरणे तयार करा व सोडवा.
  माहिती : अमनकडे ३२५ मणी, सुलभाकडे १५० मणी.
  उदाहरण : अमनकडे ३२५ मणी आहेत. सुलभाकडे १५० मणी आहेत. सुलभाने आणखी किती मणी घ्यावे, म्हणजे दोघांकडे सारखे मणी होतील ?
  सुलभाने आणखी ☐ मणी घ्यावे.

| | श | द | ए | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | ३ | २ | ५ | मणी अमनकडे |
| – | १ | ५ | ० | मणी सुलभाकडे |
| | | | | मणी घ्यावे |

- माहितीवरून वजाबाकीची उदाहरणे तयार करा व सोडवा.
  - २५७ मणी, ३०० मणी.
  - १८८ आंब्याची झाडे, २७५ पेरूची झाडे.
  - १९५ काळ्या सायकली, १०० लाल सायकली.
  - हापूसचे आंबे ३२४, पायरीचे आंबे २६८.
  - गव्हाची पोती ९३२, ज्वारीची पोती ७५०.
  - १६८ रुपये, ६२२ रुपये.

## बेरीज–वजाबाकी

✦ खालील उदाहरणे तोंडी सोडवा.

- मालतीकडे १५ निळे व ७ लाल फुगे आहेत, तर एकूण फुगे किती?
- अजितकडे काही बिया आहेत. सागरने त्याला २५ बिया दिल्या. आता अजितकडे ६५ बिया झाल्या, तर अजितकडे आधी किती बिया होत्या ?
- एका टोपलीत गुलाबाची व मोगऱ्याची मिळून ८० फुले आहेत. त्यांपैकी ३० फुले गुलाबाची आहेत, तर मोगऱ्याची फुले किती ?
- वृक्षदिंडीत १०० मुले सहभागी झाली. त्यांत ६० मुली आहेत, तर मुलगे किती ?
- अकबरने ४२ बटाटे सोलले. सलमाने ३५ बटाटे सोलले. सलमाने अजून किती बटाटे सोलले म्हणजे अकबरने सोललेल्या बटाट्यांएवढे बटाटे सोलून होतील ?

✦ माहिती व प्रश्नांच्या आधारे शाब्दिक उदाहरणे तयार करा व सोडवा.

टोनीकडील पुस्तके ७५, सोनूकडील पुस्तके ४०, नंदूकडील पुस्तके ८०.

- टोनी व सोनूकडील मिळून पुस्तके किती ?
- टोनीकडे सोनूपेक्षा किती पुस्तके जास्त आहेत ?
- टोनीपेक्षा नंदूकडे किती पुस्तके जास्त आहेत ?
- सोनूने अजून किती पुस्तके घ्यावी, म्हणजे टोनी व सोनू यांच्याकडे समान पुस्तके होतील ?

✦ माहितीच्या आधारे उदाहरणे तयार करा व सोडवा.

- लाल गोट्या १५०, निळ्या गोट्या २२०, हिरव्या गोट्या ७५.
- सलमाचे गुण २७२, नंदूचे गुण २४५, सोनूचे गुण ३३१.
- धावफलक :
  अशोक – ११०,
  सलीम – ९२,
  डेव्हिड – ४८.

